यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत

ज्ञानगंगा घरोघरी

Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India

संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac

शिक्षणशास्त्र विद्याशाखा /School of Education

जा.क्र./शिशावि./२०२५/174

दि. २७ जून, २०२५

सूचनापत्र

शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या विविध शिक्षणक्रमांच्या नवीन अभ्यासकेंद्र मान्यता, पुनर्रमान्यता आणि अतिरिक्त शिक्षणक्रमाच्या मान्यतेसाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया

पारंपरिक विद्यापीठाची मान्यता असलेल्या बी. एड. महाविद्यालयात शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या एम. ए. शिक्षणशास्त्र (M83), बी. एड. व डी. टी.एड. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम (P-10), बालसंगोपन आणि रंजन शिक्षण (C-31), स्वयं सहाय्यता समूह प्रमाणपत्र शिक्षणक्रम : मूलभूत (C-105), मूल्यशिक्षण (E-32) आणि घरकाम कौशल्य विकास प्रमाणपत्र शिक्षणक्रम (E-36) शिक्षणक्रमासाठी नव्याने अभ्यासकेंद्र सुरु करणे, अभ्यासकेंद्रावर चालविल्या जाणाऱ्या शिक्षणक्रमांची पुनर्रमान्यता प्रक्रिया पूर्ण करणे आणि अतिरिक्त शिक्षणक्रमासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. विद्यापीठाने अभ्यासकेंद्रास अंतिम मान्यता दिल्यानंतरच शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील त्या-त्या शिक्षणक्रमाचे प्रवेश संबंधित अभ्यासकेंद्रांवर विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी उपलब्ध होतील.

संस्थेच्या सुविधेसाठी पुन्हा एकदा ऑनलाईन अर्ज सादर करण्याची मुदत दि. २८ जून २०२५, ते १९ जुलै २०२५ पर्यंत वाढवून देण्यात आली आहे.

१. Application for New Learner Support Center : पारंपरिक विद्यापीठाची मान्यता असलेल्या महाविद्यालयांकडून शिक्षणशास्त्र विद्याशाखेअंतर्गत दर्शविलेल्या एम. ए. शिक्षणशास्त्र (M-83), शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम (P-10), बालसंगोपन आणि रंजन शिक्षण (C-31), स्वयं सहाय्यता समूह प्रमाणपत्र शिक्षणक्रम : मूलभूत (C-105), मूल्यशिक्षण (E-32) आणि घरकाम कौशल्य विकास प्रमाणपत्र शिक्षणक्रम (E-36) शिक्षणक्रमांचे अभ्यासकेंद्र नव्याने सुरु करावयाचे आहेत. अशा बी. एड. महाविद्यालयांना या प्रक्रियेतून ऑनलाईन अर्ज सादर करता येतील. तसेच पदविका व प्रमाणपत्र स्तरावरील शिक्षणक्रमासाठी, त्या-त्या शिक्षणक्रमनिहाय लागू असणाऱ्या निकष / नियमांनुसार महाविद्यालयांना / संस्थाना ऑनलाईन अर्ज सादर करता येतील.

२. Application for Additional Program : सध्या कार्यान्वित असलेल्या अभ्यासकेंद्रावर शिक्षणशास्त्र विद्याशाखेअंतर्गत दर्शविलेल्या शिक्षणक्रमांची मान्यता घ्यावयाची आहे अशा वरिष्ठ महाविद्यालयांनासुद्धा या प्रक्रियेच्या माध्यमातून ऑनलाईन अर्ज सादर करता येतील. एम. ए. शिक्षणशास्त्रासाठी त्या महाविद्यालयात बी. ए. शिक्षणशास्त्र या विषयाची पारंपरिक विद्यापीठाची शिकविण्यासाठी मान्यता असणे अनिवार्य आहे.

३. Application for Renewal of Learner Support Center : सध्या कार्यन्वित असलेल्या अभ्यासकेंद्रावर शिक्षणशास्त्र विद्याशाखेअंतर्गत दर्शविलेल्या शिक्षणक्रमांची पुनर्रमान्यता पूर्ण करावयाची आहे, अशा बी. एड. महाविद्यालयांना आणि अन्य संस्थाना देखील या प्रक्रियेच्या माध्यमातून ऑनलाईन अर्ज सादर करता येतील.

अभ्यासकेंद्र मान्यता प्रक्रियेसाठी खालील संकेतस्थळाला भेट द्यावी.

https://ycmou.digitaluniversity.ac/Content.aspx?ID=28422.

अ. क्र.	शिक्षणक्रम संकेतांक	शिक्षणक्रमाचे नाव
१	M-83	एम. ए. शिक्षणशास्त्र
२	P-10	शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम (DSM)
३	C-31	बालसंगोपन आणि रंजन शिक्षण (ECCE)
४	C-105	स्वयं सहाय्यता समूह प्रमाणपत्र शिक्षणक्रम : मूलभूत
५	E-32	मूल्यशिक्षण
६	E-36	घरकाम कौशल्य विकास प्रमाणपत्र शिक्षणक्रम

ऑनलाईन प्रस्ताव सादर करण्यासाठी शुल्क संरचना :

शिक्षणशास्त्र विद्याशाखेतर्फे जुन्या अभ्यासकेंद्रांची पुनर्रमान्यता आणि नवीन अभ्यासकेंद्र शुल्क नियमावली खालीलप्रमाणे विकसित करण्यात आलेली आहे.

अ. क्र.	शिक्षणक्रम	नोंदणी शुल्क	अभ्यासकेंद्र पुनर्रमान्यता शुल्क	नवीन अभ्यासकेंद्र मान्यता शुल्क
१	प्रमाणपत्र / पदविका / पदवी/ पदव्युत्तर / पदव्युत्तर पदवी नोंदणी शुल्क (Registration Fee)	रु. १,००० /-	-----	-----
२	पदवी / पदव्युत्तर पदवी	-----	रु. १०,०००/-	रु. १५,०००/-
३	पदविका	-----	रु. ७,०००/-	रु. १०,०००/-
४	प्रमाणपत्र	-----	-----	रु. १,०००/-

अभ्यासकेंद्र शुल्क भरण्याबाबतची नियमावली :

१. प्रत्येक अभ्यासकेंद्र पुनर्रमान्यता व नवीन अभ्यासकेंद्र नोंदणी शुल्क घेणे अनिवार्य आहे.
२. कोणत्याही संस्थेला एकापेक्षा जास्त अभ्यासकेंद्र नव्याने घ्यावयाचे असल्यास एकदाच नोंदणी शुल्क भरावे लागेल.
३. एका शिक्षणक्रमाची पुनर्रमान्यता आणि दुसऱ्या शिक्षणक्रमाची नव्याने मान्यता घ्यावयाची असल्यास दोन्ही कृती वेगवेगळ्या असल्यामुळे दोन्हींसाठी स्वतंत्रपणे नोंदणी शुल्क भरावे लागेल.
४. अभ्यासकेंद्र शासनाच्या अधिक्षेत्रात असल्यास कोणतेही शुल्क भरावे लागणार नाही. परंतु अशा अभ्यासकेंद्राकडून संमंत्रकांची माहिती व इतर माहिती घेण्यात येईल.
५. शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या सध्या कार्यरत असलेल्या सर्व अभ्यासकेंद्राची पुनर्रमान्यता प्रक्रिया राबविण्यात येईल.
६. अभ्यासकेंद्र मान्यता पाच वर्षांसाठी देण्यात येईल.

तांत्रिक माहितीसाठी संपर्क :

ams@ycmou.ac.in

संचालक,
शिक्षणशास्त्र विद्याशाखा

शिक्षणशास्त्र विद्याशाखा ★ य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक ★

संचालक,
विद्यार्थी सेवा विभाग